**ठळक बातम्या**

- मुंबई - अहमदाबाद बुलेट ट्रेनचं काम वेगाने होत असून लौकरच या दोन शहरातलं अंतर केवळ २ तास ७ मिनिटांवर येईल, असं रेल्वे मंत्र्यांचं प्रतिपादन
- राज्यात आज अवयवदान पंधरवड्याला प्रारंभ
- पुणे जिल्ह्यात यवत इथे झालेल्या हिंसाचाराप्रकरणी आतापर्यंत १५ जणांना अटक तर ५००हून अधिक जणांवर गुन्हा दाखल
- राज्य चित्रपट पुरस्कार येत्या मंगळवारी ५ ऑगस्ट रोजी मुंबईत प्रदान करण्यात येणार

**आणि**

- खराब हवामानामुळे अमरनाथ यात्रा यंदा वेळे आधीच स्थगित

**<><><><>**

मुंबई - अहमदाबाद बुलेट ट्रेनचं काम वेगाने होत असून लौकरच या दोन शहरातलं अंतर केवळ २ तास ७ मिनिटांवर येईल असं रेल्वे मंत्री अश्विनी वैष्णव यांनी म्हटलं आहे. गुजरातमधे भावनगर रेल्वे स्थानकात आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते.

**- - होल्ड - बाईट- अश्विनी वैष्णव - -**

भावनगर ते अयोध्या या साप्ताहिक गाडीला वैष्णव यांनी हिरवा झेंडा दाखवला. पुण्याहून मध्यप्रदेशातल्या रिवा कडे जाणाऱ्या तसंच जबलपूर ते रायपूर या गाडीचं उद्घाटनही त्यांनी दूरस्थ पद्धतीनं केलं. गेल्या अकरा वर्षात ३४ हजार किलोमीटरचे नवे रेल्वेमार्ग तयार झाले असून भारतीय रेल्वेचं मोठ्या प्रमाणात परिवर्तन होत आहे, असं ते यावेळी म्हणाले. देशातल्या तेराशे रेल्वे स्थानकांचा पुनर्विकास प्रकल्प हा जगातला सर्वात मोठा प्रकल्प असल्याचंही त्यांनी सांगितलं.

**<><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली सरकार आर्थिक विकासासाठी पायाभूत सुविधा मजबूत करत असल्याचं केंद्रीय रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांनी म्हटलं आहे. आंध्र प्रदेशात मंगलागिरी इथं ५ हजार २३३ कोटी रुपयांपेक्षा जास्त

गुंतवणुकीच्या २७२ किमी लांबीच्या २९ राष्ट्रीय महामार्ग प्रकल्पांचं उद्घाटन आणि पायाभरणी केल्यानंतर गडकरी काल बोलत होते. गेल्या अकरा वर्षात राष्ट्रीय महामार्गांची लांबी १२० टक्क्यांनी वाढली आणि २०१४ मध्ये असलेले ४ हजार किलोमीटर लांबीचे राष्ट्रीय महामार्ग आता ८ हजार ७०० किलोमीटर झाल्याची माहिती गडकरी यांनी दिली. सुधारित रस्ते, पायाभूत सुविधांमुळे, दळणवळणाचा खर्च १६ टक्क्यांवरून १० टक्क्यांपर्यंत कमी झाला असून डिसेंबर २०२५ पर्यंत या खर्चात आणखी नऊ टक्क्यांपर्यंत घट होण्याचा अंदाज आहे असं त्यांनी सांगितलं.

**<><><><>**

राज्यात आज अवयवदान पंधरवड्याला प्रारंभ झाला आहे. अवयवदान व्यापक समाज चळवळीचे पाऊल या अनुषंगानं राज्याच्या सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण विभागातर्फे राज्यभर हा उपक्रम राबवला जात आहे.

अवयवदान दिनानिमित्त आजपासून १५ ऑगस्टपर्यंत राज्यभरात अवयवदान पंधरवडा पाळला जात आहे. यानिमित्त जनजागृतीपर रॅली, सायकल रॅली, चर्चासत्र, सांस्कृतिक कार्यक्रमांचं आयोजन करण्यात आलं आहे. तसंच डॉक्टर, परिचारिका आणि आरोग्य कर्मचाऱ्यांकरता अवयवदान विषयावर कार्यशाळा, पॅरामेडिकल कर्मचारी आणि आशा सेविका यांच्यासाठीही कार्यशाळेचं आयोजन केलं आहे. १५ ऑगस्ट रोजी प्रत्येक जिल्ह्यात पालकमंत्र्यांच्या हस्ते अवयवदान करणाऱ्यांच्या कुटुंबाचा सत्कार होणार असल्याचं सार्वजनिक आरोग्य विभागानं सांगितलं आहे.

ठाणे शासकीय रुग्णालयात आज अवयवदान दिनानिमित्त कार्यक्रम झाला. अवयवदान ही सर्वात मोठी मानवसेवा असल्याचं जिल्हा आरोग्य अधिकारी डॉक्टर कैलास पवार यावेळी म्हणाले. यावेळी, डॉक्टर, परिचारक, विद्यार्थी उपस्थित होते.

**<><><><>**

स्वातंत्र्यसंग्रामातले थोर सेनानी क्रांतिसिंह नाना पाटील यांच्या जयंतीनिमित्त आज त्यांना अभिवादन करण्यात येत आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज नागपूर इथल्या शासकीय निवासस्थानी क्रांतीसिंह नाना पाटील यांच्या जयंतीनिमित्त त्यांच्या प्रतिमेला पुष्पांजली अर्पण करून अभिवादन केलं. तर उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी आपल्या समाज माध्यमावरच्या संदेशातून नाना पाटील यांना अभिवादन केलं आहे. प्रतिसरकारचे

प्रणेते, महान स्वातंत्र्यसेनानी, क्रांतिसिंह नाना पाटील यांना जयंतीनिमित्त विनम्र अभिवादन, असं पवार आपल्या संदेशात म्हणाले आहेत. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनीही क्रांतिसिंहांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून त्यांना अभिवादन केलं. मुंबई इथे मंत्रालयात सामान्य प्रशासन विभागाच्या अपर मुख्य सचिव मनिषा वर्मा यांनी त्यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन केलं. महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठातही क्रांतिसिंह नाना पाटील जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. नवी दिल्लीत महाराष्ट्र सदनातही नाना पाटील यांच्या जयंतीनिमित्त अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनी त्यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन केलं.

**<><><><>**

प्रधानमंत्री किसान सन्मान निधी योजनेचा विसावा हप्ता प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या हस्ते काल जारी करण्यात आला. या हप्त्याअंतर्गत देशभरातल्या ९ कोटी ७० लाखांपेक्षा जास्त शेतकऱ्यांच्या बँक खात्यात २१ हजार  कोटी रुपये थेट हस्तांतरित झाले.

हिंगोली जिल्ह्यातले लाभार्थीभोजराज गंगाधर राखोंडे यांनी सांगितलं.

- **- होल्ड बाईट—**

- **<><><><>**

पुणे जिल्ह्यात यवत इथे झालेल्या हिंसाचाराप्रकरणी आतापर्यंत १५ जणांना अटक झाली असून ५००हून अधिक जणांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. अटक केलेल्या १५ आरोपींना ६ ऑगस्टपर्यंत न्यायालयीन कोठडीत ठेवण्यात येणार आहे. हिंसाचाराला कारणीभूत ठरलेली वादग्रस्त पोस्ट करणाऱ्या तरुणालाही अटक करण्यात आली आहे. यवतमध्ये सध्या शांतता असून समाज माध्यमांवर पोलीस लक्ष ठेवून आहेत. या प्रकरणाच्या प्राथमिक चौकशीत कोणताही पूर्वनियोजित कट आढळला नसल्याची माहिती पोलिसांनी दिली आहे.

**<><><><>**

महाराष्ट्र राज्य चित्रपट पुरस्कार येत्या मंगळवारी ५ ऑगस्ट रोजी मुंबईत प्रदान करण्यात येणार आहेत. गानसम्राज्ञी लता मंगेशकर पुरस्कार गझलगायक भीमराव पांचाळे यांना प्रदान करण्यात येणार आहे. तसंच, चित्रपती व्ही. शांताराम जीवन गौरव पुरस्कार अभिनेता आणि दिग्दर्शक महेश मांजरेकर यांना प्रदान करण्यात येईल. चित्रपती व्ही.

शांताराम विशेष योगदान पुरस्कार अभिनेत्री मुक्ता बर्वे यांना देण्यात येणार आहे. राज कपूर जीवन गौरव पुरस्कार ज्येष्ठ अभिनेते अनुपम खेर यांना तर राजकपूर विशेष योगदान पुरस्कार अभिनेत्री काजोल यांना दिला जाणार आहे.

यंदापासून छत्रपती शिवाजी महाराज महावारसा पुरस्कार देण्याची घोषणा शासनानं केली असून सांस्कृतिक वारसा आणि इतिहास जपणाऱ्या कार्यकर्त्यांना या पुरस्कारानं सन्मानित करण्यात येईल.

**<><><><>**

मुंबईतले कबुतरखाने हटवण्याच्या मुंबई उच्च न्यायालयाच्या निर्णयानंतर महापालिकेनं सुरु केलेल्या कारवाई विरोधात जैन समाजानं आज शांतीदूत यात्रा काढली. या कारवाईमुळे आपल्या धार्मिक भावना दुखावल्या जात असल्याचं जैन समाजानं म्हटलं आहे. तर बिल्डर लॉबीचा दबावामुळे कबुतरखाना हटवला जात असल्याचा दावाही अनेकांकडून केला जात आहे.

याआधी शुक्रवारी दादर इथल्या कबुतरखान्यावरच्या कारवाईलाही जैन समाजानं विरोध केला होता. त्यानंतर पालिकेनं काल ताडपत्री लावून कबुतरखाना बंद केला आणि कबुतरांना खायला घालण्यावर बंदी असल्याची सूचना लावली आहे.

**<><><><>**

वार्षिक अमरनाथ यात्रा प्रतिकूल हवामान आणि खराब रस्ते या कारणांमुळे आजपासून स्थगित करण्यात आली आहे. ही यात्रा ९ ऑगस्ट रोजी समाप्त होणार होती. तीन दिवसांपूर्वी मुसळधार पावसामुळे यात्रा तात्पुरती थांबवण्यात आली होती. मात्र बालताल आणि पहलगाम हे दोन्ही मार्ग यात्रेसाठी सुरक्षित नसून या मार्गांवरून यात्रा पुन्हा सुरू होणार नसल्याची घोषणा काल अधिकाऱ्यांनी केली. यावर्षी सुमारे चार लाख यात्रेकरूंनी अमरनाथ गुहेचं दर्शन घेतलं आहे.

**<><><><>**

जम्मू काश्मीरमधल्या कुलगाममध्ये आज सलग तिसऱ्या दिवशीही सुरक्षा दल आणि दहशतवाद्यांमध्ये चकमक सुरु आहे. या चकमकीत आज आणखी एक दहशतवादी ठार झाला. आतापर्यंत या चकमकीत एकूण तीन दहशतवादी ठार झाले आहेत.

**<><><><>**

बीड जिल्ह्यातल्या जिल्हापरिषद गट आणि पंचायत समिती गणांचं प्रारूप प्रसिद्ध झाल्यावर त्यावर ६६ आक्षेप नोंदवण्यात आले आहेत. यावर येत्या मंगळवारी विभागीय आयुक्तांसमोर सुनावणी होईल. सर्वाधिक आक्षेप केज तालुक्यातले आहेत.

**<><><><>**

महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसचे चिटणीस प्रवीण ठाकूर यांनी अजित पवार यांच्या उपस्थितीत अलिबाग इथं राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात प्रवेश केला. यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे, मंत्री आदिती तटकरे यांच्या सह अनेक कार्यकर्ते उपस्थित होते.

**//<><><><>//**